# एप्रिल ते जून २०१८
# दरम्यान पिकांच्या संभाव्य किंमतींचा अहवाल





## एप्रिल २०१८







**भारतीय कृषि विपणन माहिती व विश्लेषण केंद्र**

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प

प्लॉट एफ/इ/७८, पहिला मजला, भूविकास बँक इमारत,

मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११ ०३७.

फोन : ०२० २४२७०३१५

वेबसाईट : http://macp.gov.in

टिप : सदर अहवाल हा बाजाराची सद्यस्थिती व भविष्यकालीन किंमत विषयक अनुमान दर्शवितो. स्थानिक व आंतरराष्ट्रीय पातळीवर नैसर्गिक (उदा. वातावरणातील बदल किवा पिकांवरील रोगराई) तसेच आर्थिक घटकांमुळे संभाव्य किंमतीमध्ये बदल होऊ शकतो. वाचकांनी सदर अहवालाचा काळजीपूर्वक वापर करावा, अन्यथा होणा-या नुकसानीस MACP प्रकल्प

## कांद्याचा संभाव्य किंमती - मे २०१८

कांदा हे अतिशय महत्वाचे व्यावसायिक भाजीपाला पिक आहे. कांदा अतिशय नाशवंत असल्यामुळे किंमतीं मध्ये खुप अस्थिरता जाणवते. तसेच माहे एप्रिल २०१८ दरम्यान लासलगाव बाजारातील कांद्याच्या सरासरी किंमती रु. ६५० प्रति क्विंटल होत्या.

FAO (२०१४) च्या आकडेवारीनुसार जागतिक कांदा उत्पादनात चीन नंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. तसेच एकुण जागतिक कांदा उत्पादनात २०% वाटा भारताचा आहे. भारतात महाराष्ट्र (२८%), हे प्रमुख कांदा उत्पादक राज्य असुन त्या नंतर कर्नाटक (१७%) व मध्य प्रदेश (१५%) या राज्याचा क्रमांक लागतो.भारतातून कांद्याची निर्यात मुख्यतः बांग्लादेश, मलेशिया, संयुक्त अरब अमिरात व श्रीलंका या देशामध्ये केली जाते.

राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या सन २०१७ -१८ च्या पहिला अंदाजानुसार भारतातील कांद्याचे क्षेत्र व उत्पादन अनुक्रमे सुमारे ११.९६ लाख हेक्टर व २१ दशलक्ष टन आहे. तर सन २०१६ -१७ करिता ते अनुक्रमे सुमारे १३.०६ लाख हेक्टर व २२ दशलक्ष टन होते. तसेच नाशिक, पुणे, सातारा, जळगांव, धुळे, अहमदनगर, नागपूर व सोलापूर ही महाराष्ट्रातील प्रमुख कांदा उत्पादक जिल्हे आहेत.

मागील १२ वर्षांतील कांद्याच्या किंमतींच्या विश्लेषण व बाजारातील सध्यस्थिती वरुन, **मे २०१८** महिन्यातील लासलगांव बाजारातील कांद्याच्या संभाव्य सरासरी किंमती **रु. ४०० ते रु. ८०० प्रति क्विंटल** या दरम्यान राहतील असे अपेक्षित आहे. असा अहवाल प्रत्येक महिन्याला प्रकाशित केला जाईल. पुढील अंदाज अहवाल माहे मे २०१८ अखेर केला जाईल.

* * * * *

## टोमॅटोच्या संभाव्य किंमती - मे २०१८

टोमॅटो हे अतिशय महत्वाचे व्यावसायिक व आहारातील भाजीपाला पिक आहे. व्यावसायिक दृष्ट्या टोमॅटो हे कमी कालावधीचे, जास्त उत्पन्न मिळवून देणारे व किफायतशीर आहे, त्याचबरोबर ते अत्यंत नाशवंत पिक आहे. एप्रिल २०१८ दरम्यान पुणे बाजारात टोमॅटोच्या सरासरी किंमती रुपये ४८५ प्रति क्विंटल होत्या.

FAO (२०१४) च्या आकडेवारी नुसार, जागतिक टोमॅटो उत्पादनात चीन नंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. तसेच एकुण जागतिक टोमॅटो उत्पादनात भारताचा ८% वाटा आहे. राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या सन २०१४-१५ च्या आकडेवारीनुसार, (भारतात महाराष्ट्र राज्य हे टोमॅटो उत्पादनात दहाव्या क्रमांकावर आहे. त्यानंतर मध्यप्रदेश, (१३%), कर्नाटक (१२%), आंध्र प्रदेश (९%), ओडिसा (८.४%) व गुजरात (७.७%) या राज्याचा क्रमांक लागतो.) नाशिक, पुणे, सातारा, अहमदनगर, नागपूर व सांगली ही महाराष्ट्रातील प्रमुख टोमॅटो उत्पादक जिल्हे आहेत.

राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या सन २०१७ -१८ च्या पहिला अंदाजानुसार भारतातील टोमॅटोचे क्षेत्र व उत्पादन अनुक्रमे सुमारे ८.०१ लाख हेक्टर व २२ दशलक्ष टन आहे. तर सन २०१६ -१७ करिता ते अनुक्रमे सुमारे ७.९७ लाख हेक्टर व २०.७ दशलक्ष टन होते.

मागील १२ वर्षातील किंमतीच्या विश्लेषण, बाजार सर्वेक्षण व बाजारातील सध्यस्थिती वरुन, **मे २०१८** महिन्यात पुणे बाजारातील टोमॅटोच्या संभाव्य सरासरी किंमती **रु. ३०० ते रु. ८०० प्रति क्विंटल** या दरम्यान राहतील, असे अपेक्षित आहे. असा अहवाल प्रत्येक महिन्याला प्रकाशित केला जाईल. पुढील अंदाज अहवाल माहे मे २०१८ अखेर केला जाईल.

* * * * *

## सोयाबीनच्या संभाव्य किंमती - एप्रिल ते जुन २०१८

सोयाबीन हे आंतराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे तेलबिया पीक आहे. अमेरिका, ब्राझील, अॅर्जेटिना, चीन व भारत या देशात सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. त्यामुळे या देशातील सोयाबीनची मागणी, पुरवठा व उपभोग या घटकामध्ये होणाऱ्या बदलाचा सोयाबीनच्या किंमतीवर परिणाम होत असतो. अमेरिकन कृषि विभागाच्या (USDA, WASDE, April - २०१८), अहवालानुसार चालु वर्षी (२०१७ - १८), जगात ३३४.८ दशलक्ष टन सोयाबीनचे उत्पादन होण्याची शक्यता आहे. मागील वर्षी ३५०.७६ दशलक्ष टन उत्पादन झाले होते. भारतात चालू वर्षी खरीप हंगामात (२०१७ - १८), सोयाबीनचे ९ दशलक्ष टन उत्पादन होण्याची शक्यता वर्तवली आहे. मागील वर्षी ११.०० दशलक्ष टन उत्पादन झाले होते. महाराष्ट्रात सन २०१७-१८ मध्ये सोयाबीनचे ३८.८६ लाख टन उत्पादन होण्याची शक्यता कृषि विभागाने वर्तविली आहे. मागील वर्षी ४५.८७ लाख टन उत्पादन झाले होते. मागील वर्षीच्या तुलनेत राज्यात चालू हंगामात उत्पादन २२.१७ टक्केने कमी होण्याची शक्यता आहे.

माहे जानेवारी ते मार्च २०१८ दरम्यान इंदूर बाजारात सोयाबीनच्या सरासरी किंमती रु.३६६६/- प्रती क्विंटल होत्या. मागील तीन महिन्यामध्ये सोयाबीनच्या किंमतीत चढता कल दिसुन येतो. चालू खरीप हंगामासाठी (२०१७-१८) शासनाने रु.३०५०/- प्रति क्विंटल किमान आधारभुत किंमत (MSP) जाहिर केलेली आहे. मागील दोन वर्षातील इंदूर बाजारातील सोयाबीनच्या एप्रिल ते जुन महिन्यातील सरासरी किंमती पुढील प्रमाणे.

| वर्ष | एप्रिल ते जुन<br>किंमती रु. (प्रति क्विंटल) |
|---|---|
| २०१५-१६ | ४०६०/- |
| २०१६-१७ | ३०००/- |

दि. १९ मार्च २०१८ रोजीच्या इंदूर बाजारातील सोयाबीनच्या फ्युचर्स किंमती खालील प्रमाणे.

| महिना | किंमती रु. (प्रति क्विंटल) |
|---|---|
| मे २०१८ | रु. ३७६०/- |
| जुन २०१८ | रु ३८१७. /- |
| जुले २०१८ | रु. ३८४५/- |

मागील काही वर्षातील किंमतीचे अर्थमिती विश्लेषण व बाजारातील सद्यस्थिती, माहे **एप्रिल ते जुन २०१८** या कालावधीत इंदूर बाजारात सोयाबीनच्या संभाव्य किंमती **रु.३८०० ते ४२००/- प्रति क्विंटल** या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सदर अहवाल प्रत्येक महिन्याला प्रकाशित केला जाईल. पुढील अंदाज अहवाल मे २०१८ मध्ये प्रकाशित केला जाईल.

* * * * *

## मक्याच्या संभाव्य किंमती - एप्रिल ते जुन २०१८

सन २०१६ - १७ मध्ये जागतिक मका उत्पादनात भारताचा वाटा २.६% होता. देशात मका पिकाचे ७३% उत्पादन खरीप हंगामात होते व उर्वरीत रब्बी हंगामात होते. मक्याच्या किंमती वर गुणवत्ता, आर्द्रता, पुरवठा व मागणी याचा परिणाम होतो. मागील १ महिन्यामध्ये निझामाबाद या बाजारातील मक्याची सरासरी किंमत रु. १,४०० /- प्रति क्विंटल इतकी आहे. त्याचबरोबर मक्याच्या वायदे बाजारातील सध्याच्या किंमती वाढता कल दर्शवित राहीली आहेत.

भारत सरकारच्या कृषि मंत्रालयाने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार वर्ष २०१६-१७ मध्ये उत्पादन २६.२६ मिलीयन टन इतके झालेले आहे. मक्याच्या उत्पादनात मागील वर्षीच्या तुलनेत १९% वाढ झालेली दिसते. वर्ष २०१६-१७ मध्ये ८.३० दशलक्ष हेक्टर इतक्या क्षेत्रावर लागवड होती. तर वर्ष २०१७-१८ मध्ये ७.९६ दशलक्ष हेक्टर इतक्या क्षेत्रावर लागवड झालेली आहे.

भारत सरकारच्या कृषि मंत्रालयाने प्रकाशित केलेल्या उत्पादन अहवाल (KMS २०१७-१८) नुसार मक्याचे उत्पादन २७.१४ दशलक्ष मेट्रीक टन इतके होण्याची शक्यता आहे. कर्नाटक आणि तेलंगन राज्यामधून मक्याची आवक सुरु झाली आहे.

सन २०१६ - १७ हंगामासाठी मक्याची किमान आधारभुत किंमत रु. १३६५ प्रति क्विंटल इतकी होती. सन २०१७- १८ हंगामासाठी किमान आधारभुत किमंत रु. १,४२५ इतकी आहे.

मागील वर्षातील मक्याच्या निझामाबाद बाजारातील मक्याच्या एप्रिल ते जुन महिन्यात सरासरी किंमती पुढील प्रमाणे.

| वर्ष / कालावधी | किंमती (रु. प्रति क्किटल) |
|---|---|
| एप्रिल ते जुन २०१७ | १५७२/- |

२० एप्रिल २०१८ रोजी वायदे बाजारातील मक्याच्या किंमती पुढील प्रमाणे.

| महिना | किंमती (रु. प्रति क्किटल) |
|---|---|
| १८ मे २०१८ (र) | १२०५ |
| २० जुन २०१८ (र) | १२३१ |
| २० जुलै २०१८ (र) | १२३१ |

मागील १२ वर्षातील मक्याच्या बाजारभावाच्याकिंमतीचे अर्थमिती विश्लेषण व बाजारातील सद्यस्थिती वरुन, **एप्रिल ते जुन २०१८** या कालावधीत **रु. ११०० ते १४००/- प्रति क्विंटल** इतक्या राहण्याची शक्यता आहे.

* * * * *

# भारतीय कृषी विपणन व माहिती विश्लेषण केंद्र

## तूरीच्या संभाव्य किंमती - एप्रिल ते जुन २०१८

भारत हा जगातील सर्वात मोठा तूर उत्पादक तसेच उपभोक्ता देश आहे. अकोला बाजार पेठेतील तूरीच्या सरासरी किंमती रु.३,८००/- ते ४,२००/- प्रति क्विंटल इतक्या कमी होताना दिसतात. भारत सरकार कृषि मंत्रालयाने प्रकाशीत केलेल्या अहवालानुसार तुर लागवडीखालील क्षेत्रात मागील वर्षीच्या तुलनेत १८% घट झालेली दिसते. वर्ष २०१६ -१७ मध्ये ५२.१९ लक्ष हेक्टर इतक्या क्षेत्रावर लागवड होती. तर वर्ष २०१७-१८ मध्ये ४२.८१ लक्ष हेक्टर इतक्या क्षेत्रावर लागवड झालेली आहे.

भारत सरकार कृषि मंत्रालयाने प्रकाशीत केलेल्या अहवाल (KMS २०१७-१८) नुसार तुरीचे उत्पाद न ३९.९ लक्ष टन होण्याची शक्यता आहे. मागील वर्षी ते ४७.८ लक्ष टन इतके होते. म्हणजेच तूर उत्पादनातच झालेल्या वाढीमुळे उपलब्धता वाढली. वर्ष २०१६ मधील लक्षणीय उत्पादन विचारात घेता तुरीच्या किंमती किमान आधारभूत किंमती पेक्षा कमी झालेल्या आहेत. सध्य परिस्थितीत शेतकरी, FPOs आणि बाजार समिती कर्मचारी इत्यादीच्या मते तुरीच्या किमती किमान आधारभूत किमती पेक्षा कमी राहण्याची शक्यता वर्तविली आहे. तुरीच्या बाजारपेठवर मागील वर्षातील तुर साठा, आयात तसेच मोठ्या प्रमाणावरील उत्पादन यांचा परिणाम असलेला दिसतो.

वर्ष २०१७ -१८ साठी तुरीची किमान आधारभुत किमंत ही रु. ५४५०/- प्रति क्विटंल इतकी आहे. मागील वर्षातील तूरीची अकोला बाजारपेठेतील एप्रिल ते जुन दरम्यानच्या तुरीच्या सरासरी किंमती पुढीलप्रमाणे:

| एप्रिल–जुन | किंमत (रु. प्रति क्विंवटल) |
|---|---|
| २०१६ | ८६१३/- |
| २०१७ | ३७८१/- |

सध्यस्थितीनुसार बाजारातील परिस्थिती विचारात घेता, अकोला बाजारपेठेतील **एप्रिल ते जुन २०१८** या कालावधीत **रु. ४,२००ते ४,८००/- प्रति क्विंटल** इतक्या राहण्याची शक्यता आहे.

* * * * *

## हरभ-याच्या संभाव्य किंमती - एप्रिल ते जुन २०१८

हरभरा हे मोठया प्रमाणावर उत्पादन आणि उपभोग असणारे डाळवर्गीय पिक आहे प्रथिनांचा स्त्रोत्र म्हणून हरभ-याला इतर पिकांच्या तूलनेत महत्वाचे स्थान आहे. जागतिक पातळीवर एकूण डाळ उत्पादनापैकी २० टक्के हिस्सा हरभ-याचा आहे. भारत, ऑस्ट्रोलिया, तूर्की,म्यानमार, पाकिस्तान आणि इथिओपिया या सहा देशामध्ये मिळून एकुण जागतिक उत्पादनाच्या ९० टक्के हरभ-याचे उत्पादन होते. भारतातील एकुण डाळ उत्पादनापैकी ४० ते ५० टक्के हिस्सा हरभ-याचा आहे. हरभरा हे मुख्यत: रब्बी पीक असून सप्टेंबर- नोव्हेंबर मध्ये लागवड व फेब्रुवारी महिन्यात काढणी होते. पिकांचा कालावधी सरासरी ९०-१२० दिवसांचा असतो.

भारत सरकारने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार वर्ष २०१८ मध्ये ९९ लक्ष हेक्टर इतकी हरभ-याची लागवड
झालेली आहे. मागील वर्षी ८७.७० लक्ष हेक्टर इतकी लागवड होती त्यामध्ये १४ टक्के वाढ झालेली दिसून येते. वर्ष २०१७-१८ मध्ये हरभ-याचे अंदाजे उत्पादन १११ लक्ष टन इतके झाले मागील वर्षी ते ९३.३० लक्ष टन इतके होते.

हरभ-याच्या बाजारातील किमतीवर साठा, आयात आणि उत्पादन या घटकांचा प्रामुख्याने परिणाम होत असतो. वर्ष २०१७-१८ साठी हरभ-याची किमान आधारभूत किंमत (MSP) ४४००/- रु. प्रति क्विंटल इतकी आहे सध्याच ी बाजारातील परिस्थती विचारात घेता बिकानेर बाजारपेठेतील **एप्रिल ते जुन २०१८** या कालावधीतील हरभ-याची किंमत **रु. ३८००-४२०० प्रति क्विंटल** इतकी राहण्याची शक्यता आहे.

* * * * *

**अधिक माहितीसाठी संपर्क**

**प्रकल्प संचालक**

**भारतीय कृषि विपणन माहिती व विश्लेषण केंद्र**

**महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प**

प्लॉट एफ/इ/७८, पहिला मजला, भूविकास बँक इमारत, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११ ०३७.
फोन : ०२० २४२७०३१५, वेबसाईट : http://macp.gov.in
इ-मेल : macpamis@gmail.com